# व्य क्ती प रि च य

| | | |
|---|---|---|
| **पूर्ण नाव** | : | **भवरलाल हिरालाल जैन** |
| **जन्मतारीख** | : | १२ डिसेंबर १९३७ (वय ७० वर्षे) |
| **जन्मस्थळ** | : | वाकोद, ता. जामनेर, जि. जळगाव - ४२५ ००१. (भारत) |
| **धर्म** | : | जैन |
| **शिक्षण** | : | बी.कॉम्, एल्.एल्.बी. |
| **व्यवसाय** | : | शेतीतून घडलेला उद्योजक |
| **स्थानिक पत्ता** | : | (निवास) जैन हाऊस, ८-९, सुयोग कॉलनी, जिल्हा पेठ, जळगाव - ४२५ ००१.<br>फोनः ०२५७-२२२००९९, फॅक्सः ०२५७-२२२११९९,<br>(कार्यालय) जैन ॲग्री पार्क, शिरसोली रस्ता, पो.बॉ. ७२, जळगाव - ४२५ ००१.<br>फोनः ०२५७-२२६००११, फॅक्सः ०२५७-२२६११३३,<br>ई-मेलः bhj@jains.com |

## श्री. भवरलाल हिरालाल जैन यांना मिळालेले मान सन्मान / पारितोषिके:

| पारितोषिक | संस्था | वर्णन | कुणी दिले | वर्ष | दर्जा |
|---|---|---|---|---|---|
| सन्माननीय सदस्यत्व | एमबीए, अमेरीकाज | परदेशी सदस्यत्वाची निवड | मास्टर ब्रेवर्स असोसीएशन, अमेरीका | १९८० | अंतर्रराष्ट्रीय |
| उद्योग पत्र | आयटीआयडी नवी दिल्ली | स्वतः घडलेला उद्योजक | उपराष्ट्रपती मा.श्री.एम्. हिदायतुल्ला | १९८२ | राष्ट्रीय |
| सन्मान | एनजीओ जामनेर | शेतीमधील असामान्य कामगिरीबद्दल | भूतपूर्व पंतप्रधान मा. श्री. मोरारजीभाई देसाई | १९८२ | प्रादेशिक |
| आय.एम.एम. बाटा मार्केटींग पुरस्कार | आय.एम.एम. बाटा | लघु उद्योजकांसाठीचे रौप्यपदक | ग्यॅनी झैलसींग भारताचे राष्ट्रपती | १९८३ | राष्ट्रीय |
| ए.आर. भट एन्टरप्रेन्युअरशीप पुरस्कार | एफ.ए.एस.एस.आय. | सेंद्रीय रसायनांच्या उद्योगात नेत्रदीपक कामगिरीबद्दल | व्ही. व्यंकटरामन भारताचे उपराष्ट्रपती | १९८४ | राष्ट्रीय |
| सर्टिफिकेट ऑफ ॲप्रीसिएशन | एम.एस.एफ.सी. | ए.आर. भट उद्योजकता पुरस्कार मिळाल्याबद्दल | एस.आर. दमानी अध्यक्ष | १९८४ | राज्य |
| उद्योगविभूषण | आयटीआयडी नवी दिल्ली | औद्योगिक क्षेत्रातील महान कामगिरीबद्दल | योजना आयोगाचे उपाध्यक्ष मा. श्री. प्रणब मुकर्जी यांचे हस्ते | १९९२ | राष्ट्रीय |
| सन्माननीय सदस्यत्व | आयआयआयई हैद्राबाद चॅप्टर | व्यावसायिक यशाबद्दल तसेच देशमान्य नैपुण्याबद्दल | आंध्रप्रदेशचे राज्यपाल मा.श्री.कृष्णकांत यांचे हस्ते | १९९३ | राष्ट्रीय |
| फाय फौंडेशन | एनजीओ इचलकरंजी | शेती व व्यवस्थापनामध्ये नाविन्य आणल्याबद्दल | लोकसभाध्यक्ष मा.श्री. शिवराज पाटील यांचे हस्ते | १९९५ | राष्ट्रीय |
| क्राफर्ड रीड स्मरणार्थ गौरव | इरिगेशन असोसिएशन अमेरीका | अमेरिके बाहेरील जगतात सिंचन व्यवस्थापन क्षेत्रात असाधारण महनीय कामगिरीबद्दल | अमेरिकेतील इरिगेशन असोसिएशनचे अध्यक्ष श्री. लुईस टोथ यांचे हस्ते | १९९७ | आंतरराष्ट्रीय |
| स्व. वसंतराव नाईक कृषि संशोधन व ग्राम विकास प्रतिष्ठान पारितोषिक | व्हीएनएसपी पुसद | शेती क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरीबद्दल | अनुपस्थितीत | १९९८ | राज्य |
| स्व. वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान पुरस्कार | व्हीएनएसपी पुसद | कृषिक्षेत्रातील नेत्रदिपक कामगिरीबद्दल | अनुपस्थितीत | १९९८ | राज्य |
| यशोदीप पुरस्कार | आयईआय नासिक चॅप्टर | नाविन्यपूर्ण कल्पनांमुळे सिंचन अभियांत्रीकी क्षेत्रात चमकून आल्याने आणि जागतिक व्यासपीठावर नांव कमावल्यामुळे | माधवराव चितळे अध्यक्ष, ग्लोबल वॉटर पार्टनरशिप | २००१ | राज्य |
| गौरव | एनजीओ (बीजेएस) भूज | भूज भूकंप पीडितांसाठी असाधारण काम केल्याबद्दल | अटर बिहारी वाजपेयी पंतप्रधान | २००१ | राष्ट्रीय |
| जीवन गौरव | रोटरी क्लब मुंबई डाऊनटाऊन | शेती व सिंचन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देवून देशाच्या प्रगतीतील सहभागाबद्दल | डॉ. गुलाम रोटरी क्लब, मुंबई | २००१ | प्रादेशिक |

......२

| पारितोषिक | संस्था | वर्णन | कुणी दिले | वर्ष | दर्जा |
|---|---|---|---|---|---|
| गांधी-आंबेडकर सामाजिक न्याय पुरस्कार | गांधी-आंबेडकर फाऊंडेशन मुंबई | शेती उद्योगात दीर्घकाळ योगदान दिल्याबद्दल | भूतपूर्व न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी | २००३ | राष्ट्रीय |
| शेती-तंत्र रत्न | व्हीसीटेक्स फाऊंडेशन मुंबई | शेतीत नवतंत्रास प्रोत्साहन दिल्याबद्दल | धवल क्रांतीचे उद्‌गाते पद्मविभूषण डॉ. वर्गिस कूरियन यांचे हस्ते | २००४ | राज्य |
| शेती औद्योगिक सामाजिक/व्यवस्थापन कार्यकुशलता पारितोषिक | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई | मुख्यत्वे करून संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या दुष्काळग्रस्त भागांत ठिबक सिंचनाचा प्रसार करून शेती विषयात चालू असलेल्या संशोधनात नाविन्य आणण्यात असाधारण योगदान दिल्याबद्दल | पद्मश्री ना.धों. महानोर मराठी कवि | २००६ | राज्य |
| डॉक्टर ऑफ लेटर्स (डी.लीट) | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव | कृषि, फलोद्यान, सूक्ष्म सिंचन, जलरक्षण आदी मधील उल्लेखनीय कार्याबद्दल | डॉ. आर.एस. माळी कुलगुरू उमवि, जळगाव | २००६ | राष्ट्रीय |
| डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एससी.) | कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | कृषि, फलोद्यान, सूक्ष्म सिंचन, जलरक्षण आदी मधील उल्लेखनीय कार्याबद्दल | डॉ. एस.एस. मगर कुलगुरू कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | २००६ | राष्ट्रीय |
| डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एससी.) | महाराणा प्रताप कृषी एवं तंत्रज्ञान विद्यापीठ, जयपुर (राजस्थान) | कृषि, फलोद्यान, सूक्ष्म सिंचन, जलरक्षण आदी मधील उल्लेखनीय कार्याबद्दल | श्रीमती प्रतिभाताई पाटील कुलपती म.प्र.कृ. विद्यापीठ, राज्यपाल-राजस्थान | २००६ | राष्ट्रीय |
| भारताचा जलरक्षक | युनेस्को ॲन्ड वॉटर डिजेस्ट | जलरक्षणात भरीव योगदान दिल्याबद्दल | जयप्रकाश नारायण यादव युनियन ऑफ स्टेट फॉर वॉटर रिसोर्सेस | २००७ | राष्ट्रीय |
| पद्मश्री | गृहमंत्रालय, भारत सरकार | कृषि विज्ञान व औद्योगिक क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल | भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील | २००८ | राष्ट्रीय |
| स्व. वसंतराव नाईक कृषिसंशोधन व ग्राम विकास प्रतिष्ठान पुरस्कार | व्हीएनएसपी, पुसद | राष्ट्रपतींतर्फे 'पद्मश्री' पुरस्कार मिळाल्याबद्दल | महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल एस.सी. जमीर | २००८ | राज्य |
| डॉक्टर ऑफ सायन्स (डि.एससी.) | तामिळनाडू कृषि-विद्यापिठ, कोईम्बतूर | कृषि आणि सूक्ष्म सिंचनातील भरीव कामगिरीबद्दल | तामिळनाडूचे महामहीम राज्यपाल एस.एस. बर्नाला | २००८ | राष्ट्रीय |
| समाजरत्न | फिलखाना जैन संघ, हैद्राबाद | सामाजिक कार्याबद्दल | राजयश सुरीश्वरजी म.सा. यांच्या निर्देशात जैन समाज-बांधवांतर्फे | २००८ | राष्ट्रीय |

# श्री. भवरलाल हिरालाल जैन - कार्यावर दृष्टीक्षेप

**शेती विषयक:**

- उच्च तंत्र शेती विश्वात असाधारण अशा संस्थांची पायाभरणी करणे, त्यांना जोपासणे आणि जगवणें, मूलभूत तसेच उपयोजित शेती संशोधन करणे आणि प्रात्यक्षिकांद्वारे शिक्षण, प्रशिक्षण, प्रदर्शने आणि तत्सम मार्गांनी विस्तार कार्यक्रम राबविणे.
- विविध स्थळांवर भव्य अशी शेतीची, वनशेतींची आणि फळबागायतींच्या लागवडींची कामे सुरू करणे.
- पावसाच्या पाण्याचं पुनर्भरण करून पाण्याची पुनर्प्राप्ती आणि पुनर्भरण यंत्रणा, मृदसंधारण, जलसंधारणाची योजना व विकास यांद्वारे टाकाऊ बंजार जमिनींचे हरितीकरण साधून बदल घडवून आणणे.
- सुयोग्य ग्रामीण तंत्रांच्या हस्तक्षेपांमार्फत चिरकाल टिकणारी ग्रामीण समृद्धी प्राप्त करणे.

**औद्योगिक:**

- देशांतर्गत तसेच निर्यात बाजारपेठांसाठी गृहाअंतर्गत तसेच घराबाहेरीलही वापरांसाठी असणा-या लाकडाला उत्तम पर्याय सिद्ध होणा-या प्लॅस्टिक उत्पादनांचे, जंगलसंपत्तीचे संरक्षण करण्याचे हेतूने भारतात सर्वप्रथम निर्माण.
- पर्यावरण संरक्षणाचे हेतूने तापविण्याकरितां तसेच प्रकाशमान करण्यासाठी सौर आणि जैव शक्तीच्या वापरावर भर.
- महाराष्ट्राचे औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या विभागात शेती उत्पादनांवर प्रक्रीया करून त्यांची मूल्यवृद्धी करण्याचे हेतूने जागतिक स्तरावरील, मुख्यत्वे निर्यातीसाठी, फळे आणि भाजीपाला प्रक्रीया उद्योगांची उभारणी.
- पाण्याच्या वाहतुकीसाठी, पाण्याच्या वाटपासाठी, शाकारून ठेवण्यासाठी आणि नियंत्रित शेती वापरांसाठी असा शेतीमधील प्लॅस्टीक पॉलीमर्सचा मोठ्या प्रमाणावरचा वापर वाढण्यासाठी अथक आणि मनःपूर्वक प्रयत्न.

**सामाजिक:**

- पौरात्य संस्कृतीच्या पायावर शैक्षणिक, क्रीड, संस्कृती आणि आरोग्य विषयांच्या रूंद कार्यक्षेत्रात कार्यरत असणा-या गुणवत्तापूर्ण व्यक्तींना, समूहांना आणि संस्थानाही उत्तेजन देणे, मदत करणे, सहाय्य करणे व घडवणे.

**शैक्षणिक:**

- खालील विविध विषयांवर भाषणांद्वारे, संवादांद्वारे सर्व थरातील जनतेशी अभ्यासपूर्ण सुसंवाद साधणेः पर्यावरण, विनोद, व्यक्तिगत आयुष्य, व्यावसायिक आणि औद्योगिक व्यवस्थापन, मानवी नातेसंबंध, ग्रामीण बाज, जागतिक संस्था घडण/आव्हाने.
- विविध विषयांवर लिखाण तसेच प्रकाशनः जल संधारण, कृषी आणि सिंचन अर्थशास्त्र आणि विकास, कामातील नैतिकता, तसेच समाजशास्त्र.

  शैक्षणिक संस्थांशी नातेसंबंध घट्ट करणे.

**सार्वजनिक संस्थामधील भूतपूर्व सदस्यत्वः**

- राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन धडककृती संघ (भारत सरकार)
- दुसरा जल-आयोग (महाराष्ट्र राज्य शासन)
- अजंता फार्मास्युटिकल्स लि. (महाराष्ट्र राज्य शासन)
- सामाजिक आणि ग्रामिण विकासासाठी इलेक्ट्रॉनिक्स (भारत सरकार)
- विकास गट, प्लॅस्टिक्स प्रक्रीया उद्योग (भारत सरकार)

**सध्याचे सार्वजनिक संस्था सदस्यत्वः**

- राष्ट्रीय फलोद्यान मंडळ, नवी दिल्ली (भारत सरकार)
- मार्गदर्शक गट, विश्वेश्वरैया नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी नागपूर (भारत सरकार)

**राज्यस्तरीय, देशस्तरीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मिळालेली पारितोषिके (सन १९८० ते २००८)**

- भारत सरकारची पद्मश्री, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची डॉक्टर ऑफ लेटर्स, कोंकण कृषि विद्यापीठ आणि उदयपुरच्या महाराणा प्रताप शेती व तंत्रज्ञान विश्वविद्यालयातर्फे डॉक्टर ऑफ सायन्स, तामिळनाडू कृषिविद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ सायन्स, आयआयआयई चे सन्माननीय सदस्यत्व, फाय फौंडेशनचा पुरस्कार, जमनालाल बजाज उचित व्यवहार पुरस्कार, उद्योग विभूषण आणि गांधी-आंबेडकर सामाजिक न्याय पुरस्कार, सामाजिक कार्याबद्दल जैन समाजातर्फे 'समाजरत्न', युनेस्को व वॉटर डायजेस्ट तर्फे भारताचा जलरक्षक सहित एकूण २६ पुरस्कार.
- 'क्रॉफर्ड रीड स्मृती आंतरराष्ट्रीय पुरस्कार' इरिगेशन असोसिएशन ऑफ यूएसए तर्फे प्रदान.

**त्यांच्या योगदानाचा सामाजिक ठसाः**

- ५० लाखांहून अधिक शेतकरी कुटूंबाच्या राहणीमानावर थेट प्रभाव पडून ते उंचावले आहे.
- २५० हून अधिक उद्योजकांना प्रेरणा मिळून त्यांची औद्योगिक प्रकल्प उभारणी.
- एकतर स्वयंरोजगारात अथवा शेतीमध्ये आणि उद्योगांमध्ये २ कोटींवर माणसे लाभदायक कामात गुंतली गेली.
- पाणी आणि वीज यांच्या बचतीद्वारे प्रतिवर्षी सुमारे १८,००० कोटी पेक्षा अधिक रुपयांची बचत.

## श्री. भवरलालजी जैन यांच्या कर्तृत्वाचा दृष्य सामाजिक ठसा

## पायाभूत प्रयत्नः लहान शेतक-यांच्या कुटुंबाच्या राहणीमानात सुधारणा

| उपक्रम | थेट फायदा | समाजास होणारे फायदे |
|---|---|---|
| पीव्हीसी पाईपांचे जाळे | ६० लाखांवर कुटुंबे | ऊर्जेच्या व वजवणुकीच्या खर्चात बचत. पाणी वाया जाणं बंद. त्यामुळं अधिक क्षेत्र लागवडीखाली संपूर्ण आयुष्यभर व त्या नंतरही टिकाऊ. |
| सूक्ष्म सिंचन यंत्रणा | १० लाखांवर कुटुंबे | दरवर्षी दर हेक्टरी किमान रु. १५,०००/- जास्तीचे उत्पन्न. दुप्पट जमीन सिंचनाखाली. |
| उच्च-तंत्र शेती संस्था | सुमारे १.५ लाख कुटुंबे | प्रशिक्षण, नव जाणीव आणि शेतक-यांकरिता प्रात्याक्षिक केंद्र, तसेच शेती-विद्यार्थी, शास्त्रज्ञ, संशोधक व अधिका-यांसाठी प्रात्याक्षिके. |
| फळं आणि भाज्या प्रक्रीया | १० हजारांवर कुटुंबे | कमित कमी हमी मूल्य आणि माल उचलण्याचीही हमी. त्यामुळं बाजारपेठेत शेतमालाला स्थैर्य आणि शेतक-यांना अधिक उत्पन्न. |
| केळीचं उती संवर्धन | १२ हजारांवर कुटुंबे | प्रति हेक्टर रु. ५०,०००/- हून अधिक उत्पन्न. अधिक वजनाचे एकसारखे घड आणि पीक हाती येण्याचे काळात बचत, दुप्पट उत्पन्न तेही निर्यातयोग्य गुणवत्तेचे. |
| कराराची शेती | ३,००० शेतकरी | भरघोस कृषि उत्पादन व उत्पन्न, खात्रीशीर मोबदला. |

### औद्योगिक उद्योजकतेला स्फूर्ती

| | | |
|---|---|---|
| पीव्हीसी पाईपांचे जाळे | १५० उद्योजक | फायदेशीर असा स्वयंरोजगार आणि एकंदरीतच संपूर्ण आर्थिक स्थितीवर. दुय्यम स्तरांवरील रोजगार निर्मितीमुळे उलगडत उलगडत प्रसार होणारा परिणाम. |
| सुक्ष्म सिंचन यंत्रणा | १०० उद्योजक | |
| उती संवर्धन | १० उद्योजक | |

### आडवळणाने रोजगाराची निर्मिती

| | | |
|---|---|---|
| अर्ध कसबी कामगार | १२ हजारांवर (पीव्हीसी पाईप) ६ हजारांवर (ठिबक सिंचन) | पीव्हीसी पाईपांच्या, ठिबक सामुग्रीच्या कारखान्यांमध्ये थेट कायमचा रोजगार. |
| तांत्रिक मनुष्यबळ | १२ हजारांवर | सुरक्षित लाभदायक स्वयंरोजगार. |
| शेतीतलं मनुष्यबळ | १.७ कोटींवर | सुधारित जमीन वापर आणि पिकांच्या दाटी दाटीनं वाढणारा हमखास असा रोजगार. |

### मौल्यवान अशा पाण्याच्या स्त्रोतांची जपणूक

| उपक्रम | वार्षिक बचत | एकूण बचत | आर्थिक परिणाम |
|---|---|---|---|
| पीव्हीसी पाईपांचे जाळे | १५ ते २०% | रु. ४४८.५० कोटी लीटर्स | रु. ४४८ कोटी |
| सूक्ष्म सिंचन यंत्रणा | ५० ते १००% | रु. १७,८००.०० कोटी लीटर्स | रु. १७,८०० कोटी |
| | एकूण.. | रु. १८,२४८.५० कोटी | रु. १८,२४८ कोटी |

......२

**दुर्मिळ उर्जेची बचत**

| उपक्रम | वार्षिक बचत | एकूण बचत | आर्थिक परिणाम |
|---|---|---|---|
| पीव्हीसी पाईप/ फूट व्हॉल्व्ह | १५% | ४५.०० कोटी कि.वॅ. प्रति तास | रु. ११३.० कोटी कि.वॅ. |
| सूक्ष्म सिंचन पद्धत | ३०% | १८.५० कोटी कि.वॅ. प्रति तास | रु. ४६.३ कोटी कि.वॅ. |
| सौरउर्जेवर पाणी तापवणे | १,२०० कि.वॅ./प्रति घर | २.२६ कोटी कि.वॅ. प्रति तास | रु. ५.६ कोटी कि.वॅ. |
| | एकूण.. | रु. ६५.७६ कोटी कि.वॅ. प्रति तास | रु. १६४.९ कोटी कि.वॅ. |

**अमूल्य योगदान:** एकात्मिक कृषिविषयक साखळी विकसित करणे.

• पावसाचे पाणी अडविणे व पडीत जमीन वापरात आणणे. • जैविक खते व सेंद्रीय शेती. • वनीकरण आणि पर्यावरण संवर्धन. • फळ आणि भाज्या प्रक्रीया व निर्यात. • मनुष्यबळ सशक्तीकरण.

**श्री. भवरलाल हिरालाल जैन**
**शेती आणि ग्रामीण विकासात त्यांचे योगदान**

१९६३ साली, अगदी सुरवातीपासूनच श्री. भवरलालजी जैन यांनी शेती हाच आपला व्यवसाय मानला. १९६३ ते १९७८ या दरम्यानचे काळात त्यांनी खते, बी-बियाणे, जंतुनाशके, ट्रॅक्टर्स आणि सिंचनासाठी लागणा-या पंपांसाठी लागणारं हलकं डिझेल तेल अशा प्रकारच्या शेतीत योगदान देणा-या जिनसांच्या वितरणाचे काम केले,

१९७८ साली एका शेती उत्पादनाचे सहाय्यानेच त्यांनी आपल्या औद्योगिक कारकिर्दीचा श्रीगणेशा केला. शेतांमध्ये पपयांची लागवड करण्यास त्यांनी शेतक-यांना प्रोत्साहित केले व त्यांपासून मिळणा-या 'पपई-दुधास' त्यांनी हमी भावाची खात्रीही दिली. अशा वापरानं, खरवडलेल्या विद्रूप पपयाही त्यांनी कँडी-टूटी-फ्रूटी बनविण्यासाठी खरेदी करण्यास सुरवात केली. त्यांनी पपई दुधाची खरेदी सुरू केल्यानं शेतक-यांना एक अधिक उत्पन्नाचा मार्ग तर मोकळा झालाच वर त्यांचा नफाही वधारला. खरोखरच, त्यांनी महाराष्ट्रात आणि गुजरात, मध्यप्रदेश अशा लगतच्या राज्यांमधील सुमारे २५०० च्या वर शेतक-यांना करार तत्वावर पपईची शेती करण्यास प्रवृत्त केले. पपईच्या दुधापासून प्रक्रीयेनं पपेन नांवाचं एन्झाइम तयार केलं गेलं आणि १९७८ पासून ते २००२ पर्यंत त्याची सातत्याने १०० टक्के निर्यात केली गेली. अशुध्द पपेनला प्रति किलो सुमारे रू.२०/- असा भाव मिळत होता. सरतेशेवटी, अतिशुध्द स्वरूपाचे पपेन रू.३००० प्रति किलो या भावाने निर्यात केले गेले. अशा प्रकारे 'पपेन' हेच त्यांचे पहिले-वहिले शेती आधारित १०० टक्के निर्यातीभीमुख असे औद्योगिक साहस ठरले.

१९८० साली मुख्यत्वे करून शेतीमधील सिंचनासाठी त्यांनी पीव्हीसीचे पाईप्स बनविण्यास सुरवात केली. त्यांनी यात पदार्पण करण्याआधी मोठ्या शहरांत त्यांच्या उत्पादनांचे बस्तान बसविलेले तीन उत्पादक आधीच हजर होते. तथापी, या उत्पादकांचा चेहरा-मोहरा शेतीशी जुळणारा असा नव्हता. शहरात बस्तान बसविलेल्या उत्पादकांपेक्षाही अगदी आगळी-वेगळी अशी आपली स्वतःची विपणन शैली श्री. भवरलालजींनी अवलंबिली. महाराष्ट्राच्या अगदी तळागाळापर्यंत आणि आजूबाजूच्या राज्यांमध्ये जिल्हास्तरावर त्यांनी वितरक नेमले. शेती-सिंचनासाठी पीव्हीसी पाईप लोकप्रिय करण्यासाठी त्यांनी एक विस्तृत असा विस्तार कार्यक्रम हाती घेतला. यामुळं ग्रामीण विपणनाचे विषयात एक प्रकारची क्रांतीच घडून आली म्हणानात! पीव्हीसी पाईपांच्या वापरानं, गळतीमुळं वाया जाणा-या पाण्याची तसंच बाष्पीभवनानं उडून जाणा-या पाण्याची बचत झाली. तसंच शेतक-यांना त्यांच्या पिकांसाठी द्याव्या लागणा-या पाण्याच्या मात्रा व गुणवत्तेवरही एकप्रकारे नियंत्रण ठेवण्याची क्षमता प्राप्त झाली.

पीव्हीसी पाईप्स इतके लोकप्रिय झाले की १९८० साली जेमतेम ५०० मे.टन इतकं सालीना उत्पन्न असणारे हे पाईप्स २००८ साली चक्क साली १,२०,००० मे.टन इतके विकू लागले. श्री. भवरलालजींनी पहिल्या दिवसापासूनच कमितकमी नफा व जास्तीत जास्त उलाढाल हे तत्व उरी बाळगले होते. कच्च्या मालाच्या किंमतीमध्ये वाढ होऊनही जवळ जवळ पांच वर्ष या कालावधित त्यांनी पीव्हीसी पाईपांच्या किंमती

......२

एकाच पातळीवर राखून त्यांमध्ये एकप्रकारे स्थैर्य आणले. अशा प्रकारे त्यांचे पीव्हीसी पाईपांच्या बाजारातील पदार्पण हे एक प्रकारे ऐतिहासिक असेच झाले. म्हणून अगदी कमी कालावधितच संपूर्ण देशभरात मिळून अशा प्रकारची सुमारे १५० आस्थापने अस्तित्वात आली. श्री. भवरलालजींच्या दैदिप्यमान यशानं लघुउद्योगांना प्रोत्साहन मिळावं हे ही नैसर्गिकच म्हणावं लागेल. पीव्हीसी पाईपांच्या सर्वदूर वापरामुळं पाणी वाहून नेताना होणा-या नुकसानीत झालेल्या बचतीनं तसंच शेतीत निघणा-या पिकात वाढ झाल्यानं साहजिकच शेतक-याचे सुबत्तेत निश्चितच वाढ झाली.

शेतीशी असलेल्या त्यांच्या बांधिलकीचाच एक नैसर्गिक अविष्कार म्हणजे त्यांनी घेतलेला पाणी वाचविण्याचा तसेच शेतीतील उत्पादन क्षमता वाढविण्याचा शोध व त्यासाठी असलेल्या सोयीस्कर तंत्रज्ञानाचा केलेला पाठपुरावा. अगदी सन १९८२-८३ इतक्या फार आधीपासूनच भारत सरकारने ठिबक व तुषार सिंचनास उत्तेजन देण्याचे हेतूने एक अनुदान योजना प्रायोजित केलेली होती. सन १९८६ च्या अखेरी अखेरीस महाराष्ट्र शासनाने देखील अशाच प्रकारची एक योजना राबविली होती. तथापी, अशा प्रकारच्या अनुदान योजना अस्तित्वात असून देखील सन १९७७-७९ सालापर्यंत महाराष्ट्रात केवळ ४०० हेक्टर्स तर संपूर्ण भारतात जेमतेम ६०० हेक्टर्स एवढ्याच जमिनीवर ठिबक संच लागले होते. त्यातही आयात केलेले माल सामान वाटप झाले होते आणि कोणत्याही प्रकारच्या सेवा पुरवल्या जात नव्हत्या. या पध्दतीमुळं त्याच्या प्रसारावर अर्थातच मर्यादा पडत होत्या. ह्या चित्रात १९८८ साली जैन इरिगेशनने पदार्पण करताक्षणीच जमीन-अस्मानाचा फरक पडला.

अगदी सुरवाती पासूनच श्री. भवरलालजींनी एकसंध असा दृष्टीकोन ठेवला. केवळ नळ्या आणि गाळण यंत्रणांचे उत्पादन गुणवत्तापूर्णरित्या करणें आणि त्यांची विक्री करणे एवढ्यावरच भागणार नव्हते तर त्याचबरोबर शेतक-यांना विक्रीपूर्व तसेच विक्रीपश्चात सेवाही पुरविण्याचा त्यांनी विडा उचलला. अशा सेवांमध्ये शेतांना शेतीतज्ज्ञांच्या तसेच अभियंत्यांच्या ठराविक काळानंतर होणा-या हमखास निरीक्षण भेटी, प्रशिक्षित हुषार चालकांची तरतूद, जमविलेल्या माहितीच्या आधारे, यशोगाथांद्वारे, पत्रकांमधून, चर्चासत्रांद्वारे, प्रदर्शनांच्या माध्यमांतून, फलकांचेद्वारे आणि प्रात्यक्षिकांद्वारे शिक्षण देण्याचा अंतर्भाव होता. शेतातील माती, पाणी आणि शेती-हवामानाच्या परस्पर संबंधांचा तौलनिक अभ्यास करून मगच बसविल्या जाणा-या सिंचन संचाची सखोल माहितीची संगणकीय योजना तयार करण्यासाठी लागणा-या सेवांसह मूलभूत सेवा म्हणजे शेतीचा सर्व्हे-नकाशा, माती-पाणी परीक्षण याही सेवा दिल्या जात होत्या.

याचेच जोडीला शेतक-यांमध्यें, नोकरशाहीमध्यें, समाज सेवकांमध्यें तसेच मत बांधणी करणा-यांमध्यें एक प्रकारची जागरूकता निर्माण व्हावी म्हणून एक जबरदस्त कार्यक्रम हाती घेण्यात आला. कर्तव्यभावनेनं झपाटूनच शेतक-यांचे मेळावे, प्रशिक्षण वर्ग, भेटीगाठींची मोहीमच चालवली गेली. त्यापाठोपाठ अशा प्रकारांसाठी एक कायम कार्यकर्ती संस्थाच उभारली गेली. सिंचनाचे वेळापत्रक आणि विविध पिका बरहुकूम पाणी गरजा यांचे तक्तेच एक कायमस्वरूपी संदर्भ म्हणून देण्यात आले. ही सर्व यंत्रणा शेतक-याचे दारी नेऊन पोहचविण्यात आली. सुरवाती सुरवातीला, कंपनीच्या प्रशिक्षित माणसांनीच नळ्या पसरवणे, जोडणे, तपासणे - चांचण्या घेणे, बसविणे आणि चालू करणे ही कामे केली. चालविण्याचे शिक्षण देणारी पुस्तिकाही दिली

गेली. अगदी संकल्पने पासून ते थेट चालू करण्यापर्यंत एक बेतून घडवलेली यंत्रणा अशी जाग्यावर सुरू करण्यापर्यंत राबवली. अशाप्रकारे, एक पूर्णपणे शास्त्रशुद्ध आणि या भारत देशात ठिबक यंत्रणा राबविण्यात बिनीचे काम त्यांनी प्रस्थापित केले.

आत्तापर्यंत जवळजवळ भारतातील प्रत्येक राज्यातून आलेल्या ६१८ शेतकरी समूहांनी इथे प्रत्यक्ष भेट दिलीय आणि किमान ७७,००० शेतक-यांनी संपर्क साधलाय तरी किंवा अशा कार्यक्रमांमध्यें सहभाग तरी घेतलाय. संशोधन व विकास शेतीला १६५०० विद्यार्थ्यांनी भेटी दिल्यात तर बीडीओ, एडीओ, ग्राम सेवक अशा शासकीय अधिका-यांची संख्या भेट देणा-यांमध्ये, प्रशिक्षित केलेल्यांमध्यें आहे. महाराष्ट्राच्या लगत असणा-या अनेक राज्यांच्या शेती मंत्र्यांनीही इथल्या आस्थापनांना भेटी दिल्या आहेत. परदेशी मंत्री देखील जैन हायटेक ॲग्री इन्स्टीट्युटला भेट देऊन गेले त्यात आफ्रिका, अफगाणिस्तान, श्रीलंका, मॉरीशस यांचा समावेश आहे. या राज्यातील शेतकरी देखील प्रशिक्षणास येऊन गेले. इथं येऊन वस्तुस्थिती जाणून घेण्याचे इच्छेनं आलेल्या नामवंतांमध्यें उपराष्ट्रपती श्री. भैरोसिंग शेखावत, माजी पंतप्रधान श्री. चंद्रशेखर, उपपंतप्रधान श्री. देवीलाल, तसेच भूतपूर्व पंतप्रधान आणि विद्यमान केंद्रीय मंत्री तसेच मुख्यमंत्री आणि अन्य मंत्रीगण विविध राज्यांच्या राज्यपाल यांचा समावेश होतो. एवढे भीमकाय प्रयत्न केल्यामुळंच १९८८ साली जेमतेम ६०० हेक्टर्स असलेलं ठिबक सिंचना खालचं क्षेत्र २००८ साली ९ लाख हेक्टर्सवर पोचलंय. आजमितीस या उद्योगाची वाढ दरवर्षी सुमारे १ ते १.२ लाख हेक्टर्स या प्रमाणात होते आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्यामध्ये जळगावात केळीसाठी, नाशिकमध्यें द्रांक्षांसाठी, सोलापूर जिल्ह्यात डाळिंबांसाठी सिंचन व्यवस्था जवळजवळ केवळ ठिबक मार्फतच होते आहे. याचे जोडीला विदर्भातले शेतकरी फलोद्यानासाठी तर मराठवाड्यातील कपाशीसाठी आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी उसासाठी गुजरातेत व मध्यप्रदेशात मिरची व बटाट्यांसह देशातील ४५ पिकांवर प्रामुख्यानं याच ठिबक प्रणालीवर विसंबून राहतात.

याच मार्ग शोधक धडपडींनी श्री. भवरलाल जैन यांच्या आयुष्याचा आणि कर्तृत्वाचा बराचसा भाग व्यापला आहे. जिथं अशाप्रकारचे कोणतेच उद्योग मुळातच अस्तित्वात नव्हते त्या ठिकाणी त्यांना एका नव्या शेती उद्योगांची उभारणी करण्यात यश लाभलं. क्रांती तर झालीच झाली. जगाच्या ठिबक नकाशावर भारताला क्र. २ चं स्थान मिळवून देण्यात सिंहाचा वाटा, निश्चितपणे श्री. भवरलालजींनाच द्यांवा लागेल व त्यांच्या कंपनीलाही. जैन इरिगेशन म्हणजेच ठिबक सिंचन असं गणित पक्कं झालंय. म्हणूनच, ही आणि या सारख्या इतर यशांची पावती फक्त भारत सरकारनं आणि महाराष्ट्र राज्य शासनानंच नव्हे तर आंतरराष्ट्रीय समुदायानंही राजरोसपणे दिली आहे.

शेतीमधील जैव तंत्रज्ञान क्षेत्रात भरीव कामगिरी करणारा आणि एकप्रकारे प्रगतीमधील मैलाचा दगड मानावा लागेल तो केळी मधील उती संवर्धनाला. अत्यंत उच्च प्रतीची गुणवत्ता हमीपूर्वक देण्यासाठी एक केळी उती संवर्धन प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी श्री. भवरलाल जैन यांनी असाधारण मेहनत घेतलीय. देशभरातील हजारो शेतक-यांनी यामुळे त्यांचे प्रत्येक घडाचे उत्पन्न सरासरी ११ किलोंपासून थेट २३ किलोंवर नेलंय आणि पीक हाती येण्याचा कालावधी १८ महिन्यांवरून ११ महिन्यांवर आणलाय. उत्तर-पूर्वे कडील राज्ये वगळता हा संदेश सर्व राज्यांत वेगाने पोचतोय. आपापल्या गरजेच्या रोपांची आगाऊ नोंदणी करून राखीव करणं आणि आपली पाळी येण्याची वाट पाहणं हे आता शेतक-यांच्या अंगवळणी पडलंय.

......४

"ग्रँडनैन" या नांवाची उती संवर्धित केळी रोपांची नवी जात व्यापारी तत्वावर वितरित करण्याचा पहिला मान श्री. भवरलालजी जैन यांचेकडे जातो. युरोपांमधील तसेंच अमेरिकेमधील बाजारपेठांमध्यें "ग्रँडनैन" जातीची ताजी पिकली केळी निर्यात करण्याचं त्यांचं स्वप्नंही साकार झालयं. स्वतःच्या गरजेपोटी आयात करणारी राष्ट्रे भारतातून अन्य जातींची फारशी केळी घेत नाहींत. अशा रितीने ताज्या पक्व केळ्यांची निर्यात साधून देशाच्या संपत्तीत मोलाची भर तर पडते आहेच शिवाय शेतक-यांच्या उत्पन्नात थेट भर पडली आहे आणि श्री. भवरलालजी जैन यांना आणखी एका पायाभूतबिनीचे काम केल्याचे श्रेय मिळाले. आतां सर्व लक्ष नवनव्या जाती आणण्यावरच केंद्रित आहे. श्री. भवरलालजींना आतां कांद्यामध्यें उती संवर्धन यशस्वी करण्यात यश आलंय. कांही औषधी वनस्पती आणि जैव-इंधनदायी वनस्पतींवर आणि त्यांच्या सूक्ष्म गुणित पुनरूत्पादन पद्धतींविषयी संशोधन चालू आहेच.

शेती संस्कृतीला अत्यंत अनमोल ठरणारी आणखी एक संस्था श्री. भवरलाल जैन यांनी स्थापन केली आहे. जैन उच्च-तंत्र शेती संस्थान - शेतमालावर संशोधन विकास व प्रात्यक्षिके, प्रशिक्षण आणि विस्तार केंद्र. पडिक जमिनीचा विकास, नापिक जमीन लागवडीखाली आणणे, मृदसंधारण, डोंगराळ व खडकाळ जमिनीवर लागवड करणे, पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करणे, जलसंधारणाचे व्यवस्थापन, खतपाणी, हरितगृहे व त्याच बरोबर सेंद्रीय आणि जैव खते तसेच जैव-किटकनाशके हे सर्व एका छत्राखाली असलेलं पाहण्यासाठी दरवर्षी किमान २०,००० शेतकरी व इतर इच्छुक या शेतीला प्रत्यक्ष भेट देतात व या सर्व कामांत आणि शेतीतील उच्च तंत्र व त्यामधील अत्याधुनिक विकास पाहण्यास साक्षी राहतात.

शेत मालामध्यें मूल्यवर्धन साधण्यासाठी आणि उत्पादन साखळीचा विस्तार साधण्यासाठी श्री. भवरलाल जैन यांनी भाज्यांचे निर्जलीकरण आणि फळ प्रक्रीया कारखानेहि सुमारे १५० कोटी रूपयांवर भलीमोठी गुंतवणूक करून उभे केले आहेत. एखादं पीक जर एखाद्या राज्यात भरपूर उपलब्ध होत असेल तर परप्रांतातूनही, ताज्या भाज्या आणि फळं मागवली जातात.

या सर्व यशोगाथेची पाळंमुळं सामान्यतः शेतकरी वर्गाची प्रगती साधण्यासाठी असलेल्या सूत्रबद्ध अशा वैयक्तिक तसेंच संस्थापक बांधिलकीमध्येंच असतात. जरी शेती आधारित गरीब अशा भारतीय समाजाशी व शेतक-यांशी व्यवसाय करणे हीच मुळी एक धोकेबाज संकल्पना मानली जाते तरीही श्री. भवरलालजींचे सर्वच व्यवसाय शेती व शेतक-यांशीच संबंधित आहेत याचं कारण त्यांना नफ्यापेक्षाही ध्येयवादाशी असलेलं घट्ट नातं अधिक भावतं. या सर्व शेती आधारित उद्योगांमध्यें आजतागायत सुमारे ७०० कोटींवर भांडवली गुंतवणूक झालेली आहे - स्वातंत्र्यानंतरच्या काळात कशाही प्रकारे विचार केला तरी हा आकडा निश्चितच कौतुकास्पद आहे.